RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष १, अंक ७८] बुधवार, ऑक्टोबर ७, २०१५/आश्विन १५, शके १९३७ [पृष्ठे १६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### नगरविकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक ७ ऑक्टोबर २०१५

### अधिसूचना

**पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४.**

क्रमांक (एन.एच.पी. २०१४/सी.आर.४०३/युडी-३४).— महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रांतील फेरीवाल्यांचे विनियमन व नियंत्रण करण्याच्या दृष्टीने, पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ (२०१४ चा ७) याच्या कलम ३६ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाकडून करण्याचे योजिलेल्या पुढील नियमांचा मसुदा, त्याद्वारे बाधित होण्याची शक्यता असणाऱ्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि अशी नोटीस देण्यात येते आहे की, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांचा कालावधी समाप्त होईल त्या दिनांकास आणि त्यानंतर उक्त मसुदा महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त कालावधीत, उक्त मसुद्यासंबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना सचिव (नवि-२), नगरविकास विभाग, ४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे टपालाद्वारे अथवा ई-मेलद्वारे (uddus34@gmail.com) प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

### नियमांचा मसुदा

क्रमांक (एन.एच.पी. २०१४/ सी.आर.४०३/यू.डी-३४) नगरविकास विभाग, ४था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.—ज्याअर्थी, महानगरपालिका व नगरपरिषदा क्षेत्रातील फेरीवाल्यांचे विनियमन व नियंत्रण करण्याच्या दृष्टीने, पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ (२०१४ चा ७) याच्या कलम ३६ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांनी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग एक-अ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना क्रमांक (एन.एच.पी. २०१४/सी.आर.४०३/युडी-३४), दिनांक ................................................... याद्वारे नियम

करण्याचा त्यांचा उद्देश असल्याचे घोषित केले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार त्यात नमूद केलेल्या कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती व सूचना शासनाने विचारात घेतलेल्या आहेत.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र शासन पूर्वप्रसिद्धीनंतर, पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ (२०१४ चा ७) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महानगरपालिका व नगरपरिषदा क्षेत्रांतील फेरीवाल्यांचे विनियमन व नियंत्रण करणारी योजना खालीलप्रमाणे तयार करीत आहे :—

## प्रकरण एक

## **प्रारंभिक**

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व तरतुदी.—** (एक) या नियमांना, महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम, २०१५ असे म्हणावे.

(दोन) ते, महाराष्ट्र राज्यातील सर्व नागरी क्षेत्रांना लागू असतील.

(तीन) ते, महाराष्ट्र शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येतील.

(चार) या नियमांच्या तरतुदीं, रेल्वे अधिनियम, १९८९ (१९८९ चा २४ ) अन्वये भारतीय रेल्वेच्या मालकीच्या व त्यांच्याकडून नियंत्रण केले जाणाऱ्या कोणत्याही जमिनीस, जागेस व रेल्वेनां लागू असणार नाहीत.

२. **व्याख्या.—**या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ असा आहे.

(ख) "जात प्रमाणपत्र" याचा अर्थ, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २०१२ किंवा इतर कोणत्याही संबंधित अधिनियमाच्या किंवा याबाबतीत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी केलेल्या अथवा कोणत्याही नियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र, असा आहे.

(ग) "मुख्याधिकारी" याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याच्या तरतुदींअन्वये स्थापन केलेल्या नगरपरिषदेचा मुख्याधिकारी, असा आहे आणि अतिरिक्त मुख्याधिकारी व सहायक मुख्याधिकारी यांचा आंतर्भाव असेल.

(घ) "विद्यमान पथ विक्रेता" याचा अर्थ, पथ विक्रेत्यांच्या दुसऱ्या सर्वेक्षणापूर्वी पथ विक्री करणारा नोंदणी केलेला पथ विक्रेता असा आहे.

(ङ) "कुटुंब" या संज्ञेत, स्वतः ती व्यक्ती, त्याचा किंवा तिचा वैवाहिक जोडीदार, अज्ञान मुले, त्याच्यावर अवलंबून असलेले अज्ञान भाऊ व अज्ञान बहिणी यांचा आंतर्भाव होतो. परंतु, विधवा, घटस्फोटिता आणि कुटुंबांने अभित्याग केलेल्या महिला यांना स्वतंत्र कुटुंब मानण्यात येईल :

**स्पष्टीकरण.—**या नियमाच्या प्रयोजनार्थ, कोणतीही प्रौढ स्त्री-पुरूष जोडीदार किंवा मुले किंवा अवलंबित व्यक्ती यांसह किंवा याशिवाय, वेगळे कुटुंब असल्याचे मानण्यात येईल.

(च) "तक्रार निवारण समिती" याचा अर्थ, उक्त अधिनियमाच्या कलम २० च्या पोट-कलम (१) द्वारे गठीत केलेली समिती, असा आहे.

(छ) "उत्पन्नाचा दाखला" याचा अर्थ, स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेत संबंधित अधिनियमाअन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला एकूण वार्षिक उत्पन्न दर्शविणारा दाखला, असा आहे.

(ज) "अनुज्ञाप्ती प्राधिकारी" याचा अर्थ, योजनेत उल्लेखिलेल्या अटीं व शर्तीनुसार पथ विक्रेत्यांना विक्री प्रमाणपत्र व ओळखपत्रे देण्यासाठी महानगरपालिका आयुक्ताने किंवा, यथास्थिति, मुख्याधिकाऱ्याने पदनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे.

(झ) "महानगरपालिका आयुक्त" याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषद अधिनियम, १९४९ याच्या तरतुदींअन्वये महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे आणि त्यात अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, महानगरपालिका उपायुक्त व सहायक महानगरपालिका आयुक्त यांचा आंतर्भाव असेल.

(ञ) "उपजीविकेचे साधन" याचा अर्थ, कुटुंबाचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी पुरेसा असणारा, कुटुंबातील एक किंवा अधिक व्यक्तींच्या आर्थिक मिळकतीची ज्यात तरतूद आहे, असा कोणत्याही नावाने संबोधला जाणारा व्यवसाय, कामधंदा किंवा इतर कोणतीही कृती, असा आहे.

(ट) "प्रभाग समिती" याचा अर्थ, अधिनियमात विहित करण्यात येतील अशी एक किंवा अधिक कार्ये पार पाडण्यासाठी महानगरपालिका आयुक्ताने किंवा, यथास्थिति, मुख्याधिकाऱ्याने नियुक्त केलेली समिती, असा आहे.

(ठ) या नियमांतील शब्द किंवा शब्दप्रयोग यांना, ते विनिर्दिष्टपणे व्यक्त केले असल्याखेरीज, पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम, २०१४ यात जो अर्थ दिलेला असेल तोच अर्थ असेल.

३. **पथविक्रीसाठी किमान वय.—** बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, १९८६ याच्या तरतुदी आणि त्याखाली तयार केलेले नियम यांना अधीन राहून, ज्याने वयाची चौदा वर्षे पूर्ण केली आहेत अशा प्रत्येक पथ विक्रेत्याला पथ विक्री प्रमाणपत्र देता येईल.

४. (एक) महानगरपालिका आयुक्त किंवा, यथास्थिति, मुख्याधिकारी याने दिलेल्या आदेशाने बाधित झालेला पथ विक्रेता, असा आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत तक्रार निवारण समितीसमोर अर्ज दाखल करील.

(दोन) अर्जदार, त्याच्या नियंत्रणापलीकडील परिस्थितीमुळे उक्त कालावधीत अपील दाखल करू शकला नाही अशी जर तक्रार निवारण समितीची खात्री पटली तर, ती अर्ज दाखल करण्यातील उशीर क्षमापित करील आणि अशा क्षमापनासाठीची कारणे नोंदवील.

(तीन) तक्रारींचे कारण नमूद करून साध्या कागदावर अर्ज करता येईल.

५. **अपिलावर निर्णय देण्याचा कालावधी :—**(१) तक्रार निवारण समिती, अर्जदारास वाजवी संधी दिल्यानंतर आणि अनुज्ञाप्ती प्राधिकाऱ्याकडून वस्तुस्थितीची खात्री करून घेतल्यानंतर असा अर्ज प्राप्त झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत अशा अर्जावर निर्णय देईल.

(२) तक्रार निवारण समिती, अर्जदारास यथायोग्य आदेश कळवील.

६. **स्थानिक प्राधिकरणाकडे अपील :—**(१)तक्रार निवारण समितीच्या किंवा यथास्थिती नगर पथ विक्रेता समितीच्या निर्णयाने व्यथीत झालेली कोणतीही व्यक्ती, असा आदेश प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीत स्थानिक प्राधिकरणाकडे अपील दाखल करील.

(२) तक्रार निवारण समितीच्या किंवा यथास्थिती नगर पथ विक्रेता समितीच्या आदेशासह साध्या कागदावर कारणे नमूद करून अपील करता येईल.

(३) स्थानिक प्राधिकरण, त्याची स्वतःची खात्री पटल्यानंतर व उशीर होण्याची अशी कारणे नमूद करून उशीर क्षमापित करील. अपीलकर्ता परिस्थिती त्याच्या नियंत्रणापलीकडे असल्याने अपील दाखल करू शकला नाही, अशी जर त्याची खात्री पटली असेल तर, उशीर क्षमापित करता येईल.

(४) स्थानिक प्राधिकरण, असे अपील प्राप्त झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत अशा अपिलावर निर्णय देईल. असा घेतलेला निर्णय अर्जदारास कळविण्यात येईल.

७. **नगर पथ विक्रेता समितीची रचना :—** (१) महाराष्ट्र शासनास प्रत्येक स्थानिक प्राधिकरणासाठी महानगरपालिका आयुक्त, किंवा, यथास्थिति, मुख्याधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नगर पथ विक्रेता समिती घटीत करता येईल.

(२) नगर पथविक्रेता समितीची रचना खालीलप्रमाणे असेल :—

(क) महानगरपालिका क्षेत्रासाठी नगर पथविक्रेता समितीची रचना.

| | | |
|---|---|---|
| (एक) महानगरपालिका आयुक्त | .. | अध्यक्ष |
| (दोन) विशेष नियोजन प्राधिकरणाचा कार्यकारी प्रमुख किंवा प्रतिनिधी | .. | सदस्य. |
| (तीन) पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक | .. | सदस्य. |
| (चार) अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त | .. | सदस्य. |
| (पाच) पोलीस सहआयुक्त किंवा पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस अधीक्षक (वाहतूक प्रभार असणारा अधिकारी) | .. | सदस्य. |
| (सहा) कार्यकारी आरोग्य अधिकारी किंवा मुख्य वैद्यकीय अधिकारी | .. | सदस्य. |
| (सात) अग्रणी बँकेचा प्रतिनिधी | .. | सदस्य. |
| (आठ) महानगरपालिका उपायुक्त (नियोजन)/ सहायक संचालक, नगररचना | .. | सदस्य. |
| (नऊ) सभागृह नेता | .. | सदस्य. |
| (दहा) विरोधी पक्षनेता | .. | सदस्य |
| (अकरा) नगर पथविक्रेता समितीच्या एकूण सदस्यांच्या चाळीस टक्कयांहून कमी नसतील इतके पथ विक्रेता संघाचे प्रतिनिधी : | .. | सदस्य |

परंतु, पथविक्रेत्यांचे प्रतिनिधित्व करणारे एक तृतीयांश सदस्य हे महिला विक्रेत्यांमधील असतील आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक व विकलांग व्यक्ती यांना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार यथोचित प्रतिनिधित्व दिले जाईल.

(बारा) पणन संघाचा प्रतिनिधी .. सदस्य.

(तेरा) व्यापारी संघाचा प्रतिनिधी .. सदस्य.

(चौदा) अशासकीय संघटनेचे दोन प्रतिनिधी .. सदस्य.

(पंधरा) समुदाय आधारित संघटनेचे दोन प्रतिनिधी .. सदस्य.

(सोळा) निवासी कल्याण संघाचा एक प्रतिनिधी .. सदस्य.

(सतरा) महानगरपालिका उपायुक्त (यथ विक्री प्रभार असणारा) .. सदस्य सचिव.

(ख) नगरपरिषद क्षेत्रांसाठी नगर पथ विक्रेता समितीची रचना

(एक) नगर परिषदेचा मुख्याधिकारी .. अध्यक्ष.

(दोन)नगर परिषदेच्या अध्यक्षाने (सभागृहनेत्याने) नामनिर्देशित केलेला सदस्य .. सदस्य.

(तीन) विरोधी पक्षनेता .. सदस्य

(चार) पोलीस ठाण्याचा प्रभारी .. सदस्य

(पाच) स्थानिक प्रभारीवाहतूक पोलीस .. सदस्य.

(सहा) वैद्यकीय आरोग्य अधिकारी .. सदस्य.

(सात) नगररचना प्रभारी .. सदस्य.

(आठ) विशेष नियोजन प्राधिकारणाचा प्रतिनिधी (यथास्थिति) .. सदस्य.

(नऊ) अग्रणी बँकेचा प्रतिनिधी .. सदस्य.

(दहा) नगर पथविक्रेता समितीच्या एकूण सदस्यांच्या चाळीस टक्क्यांहून कमी नसतील इतके पथ विक्रेता संघाचे प्रतिनिधी. .. सदस्य.

परंतु, पथविक्रेतांचे प्रतिनिधित्व करणारे एक तृतीयांश सदस्य हे महिला विक्रेत्यांमधील असतील आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्याक व विकलांग व्यक्ती यांना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार यथोचित प्रतिनिधीत्व दिले जाईल

(अकरा) पणन संघाचा प्रतिनिधी .. सदस्य.

(बारा) व्यापारी संघाचा प्रतिनिधी .. सदस्य.

(तेरा) अशासकीय संघटनेचे दोन प्रतिनिधी .. सदस्य.

(चौदा) समुदाय आधारित संघटनेचा प्रतिनिधी .. सदस्य.

(पंधरा) निवासी कल्याण संघाचा प्रतिनिधी .. सदस्य.

(सोळा) नगरपरिषदेच्या पथ विक्रेता विभागाचा प्रभारी .. सदस्य सचिव.

८. **नगर पथविक्रेता समितीकरिता नामनिर्देशन.—**(१) महानगरपालिका आयुक्त, किंवा यथास्थिति, मुख्याधिकारी, पुढील प्रवर्गातून नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशन करण्यासाठी इच्छूक व्यक्तींकडून अर्ज मागवील,

(क) पणन संघ

(ख) व्यापारी संघ

(ग) अशासकीय संघटना

(घ) समुदाय आधारीत संघटना

(ड) निवासी कल्याण संघ

परंतु, किमान दोन स्थानिक वृत्तपत्रे तसेच मुख्यालयातील व सर्व प्रभाग कार्यालयातील सूचना फलकावर प्रदर्शित करून त्यांना व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल तसेच ते महानगरपालिकेच्या, किंवा यथास्थिती, नगरपरिषदेच्या संकेतस्थळावरदेखील प्रदर्शित करील.

(२) अशा नोटिशीच्या प्रसिद्धीच्या शेवटच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अर्ज प्राप्त झालेला असावा.

९. **किमान अर्हता.—**अशा नामनिर्देशनासाठी किमान आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे असेल :—

(क) संघटनेची किंवा संघाची, नियम ८ च्या उप नियम १ मध्ये विनिर्दिष्टि केलेल्या क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.

(ख) संघटना किंवा संघ, सक्षम अभिकरणाकडून प्राप्त झालेले मागील किमान तीन वर्षाचे लेखापरीक्षा अहवाल सादर करील.

(ग) संघटनेस किंवा संघास महानगरपालिकेने, किंवा, यथास्थिति नगरपरिषदेने काळ्या यादीत टाकलेले नसावे.

(घ) संघटनेस किंवा संघास अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये दोषी ठरवलेले नसावे.

(ङ) संघटनेस किंवा संघास, सक्षम प्राधिकरणाकडे त्याच्या नोंदणीच्या प्रवर्गात काम करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असावा.

**१०.** (१) ज्यावेळी अधिक अर्ज प्राप्त होतील त्यावेळी नगर पथ विक्रेता समितीचे पदसिद्ध सदस्य नियम ७ (२) (क) (बारा) ते ७ (२) (क) (सोळा) आणि ७ (२) (ख) (अकरा) ते ७ (२) (ख) (पंधरा) यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गासाठी प्राप्त झालेल्या अर्जामधून सदस्य नामनिर्देशित करतील.

(२) महानगरपालिका आयुक्त, किंवा, यथास्थिति, मुख्याधिकारी, नगर पथ विक्रेता समितीचे सदस्य म्हणून संघटनेच्या किंवा संघाच्या प्रतिनिधीमधून असे सदस्य नियुक्त करील.

**११. निवडणुकीद्वारे पथ विक्रेत्यांचे प्रतिनिधी.—**कामगार आयुक्त किंवा कामगार अधिकारी या दर्जाहून कमी दर्जा नसणारा त्याचा दुय्यम अधिकारी, महानगरपालिकेतील, किंवा, यथास्थिति, नगरपरिषदेतील पथ विक्रेत्यांच्या प्रतिनिधीच्या नियुक्तीसाठी निवडणूक घेईल.

**१२. मतदार यादी.—** महानगरपालिका आयुक्त किंवा, यथास्थिति, मुख्याधिकारी नोंदणी केलेल्या पथ विक्रेत्यांमधून प्रतिनिधींची निवड करण्याच्या प्रयोजनार्थ, नोंदणी केलेल्या पथ विक्रेत्यांची यादी, कामगार आयुक्तांना देईल. अशा निवडणुकीच्या प्रयोजनासाठी नोंदणी केलेल्या पथ विक्रेत्यांची यादी ही, मतदार यादी असेल.

**१३.** (१) कामगार आयुक्त, अशी नामनिर्देशपत्रे भरण्याकरिता, वेळ व ठिकाण, यासह निवडणूक कार्यक्रम अधिसूचित करील आणि त्याचबरोबर निवडणूक कार्यक्रमास किमान दोन स्थानिक वृत्तपत्रांत तसेच संबंधित महानगरपालिकेच्या किंवा, यथास्थिती, नगरपरिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर व्यापक प्रसिद्धी देईल.

(२) निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे असेल :–

(क) नामनिर्देशनपत्रे भरण्याकरिता, नामनिर्देशनपत्र भरण्याचा पहिला व अंतिम दिवस धरून, निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून सात दिवस.

(ख) अशा मिळालेल्या नामनिर्देशनपत्रांच्या छाननीची वेळ व ठिकाण :

परंतु, ती नामनिर्देशनपत्रे भरण्याच्या अंतिम दिवसापासून दोन दिवसांनंतरची नसेल, कामगार आयुक्त, अशा उमेदवारांना त्याच दिवशी निवडणूक चिन्ह नेमून देईल.

(ग) नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक, हा दिनांक नामनिर्देशनपत्राची छाननी केल्याच्या दिनांकापासूनच्या दोन दिवसांनंतरचा नसेल.

(घ) मतदानाचा दिनांक, हा दिनांक उमेदवाराचे नाव मागे घेतल्याच्या दिनांकापासूनच्या पंधरा दिवसांनंतरचा नसेल.

(ङ) कामगार आयुक्त, प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांची मोजणी करील आणि वैधरीत्या निवडून आलेल्या सदस्यांची यादी, महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिति, मुख्याधिकारी यांस सादर करील.

**१४.** (१) महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिति, मुख्याधिकारी, अशी निवडणूक घेण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व सोयी-सुविधा पुरवील.

(२) **मतदान केंद्राध्यक्ष.—**कामगार आयुक्त, अशा निवडणुकीकरिता मतदान केंद्राध्यक्षाची नियुक्ती करील आणि महानगरपालिका आयुक्त किंवा, यथास्थिति, मुख्याधिकारी यांना निकाल सादर करील.

**१५.** (१) महानगरपालिका आयुक्त किंवा, यथास्थिति, मुख्याधिकारी, नगर पथ विक्रेता समितीवर निवडण्यात यावयाच्या पथ विक्रेता प्रतिनिधींच्या संख्येइतकेच निवडणूक प्रभाग बनवील :

परंतु, महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिति, मुख्याधिकारी, नोंदणी केलेल्या पथ विक्रेत्यांची मार्गनिहाय सूची तयार करील. शक्य असेल तेथवर, विद्यमान प्रभाग समित्या किंवा प्रशासकीय झोन (प्रक्षेत्र) किंवा प्रभाग विचारात घेऊन निवडणूक प्रभाग तयार करण्यात येतील. निवडणूक प्रभाग बनविण्यासाठी, महानगरपालिका आयुक्तास किंवा, यथास्थिति, मुख्याधिकाऱ्यास झोन (प्रक्षेत्र) किंवा प्रभाग किंवा प्रभाग समितीचा संपूर्ण किंवा काही भाग एकत्र करता येईल.

(२) अनुसूचित जातीच्या, अनुसूचित जमातीच्या, इतर मागास वर्गाच्या, अल्पसंख्याक असलेल्या व विकलांगता असणाऱ्या पथ विक्रेत्यांसाठी आरक्षण असेल, असे आरक्षण प्रत्येकी एक जागा या स्वरूपाचे असेल.

(३) महिलांकरिता एक तृतीयांश आरक्षण असेल.

(४) महिलांचे आरक्षण हे, नगर पथ विक्रेता समितीतून चिठ्ठ्या काढून ठरविण्यात येईल.

(५) उप-नियम (२) मधील आरक्षित जागा यासुद्धा नगर पथ विक्रेता समितीतून चिठ्ठ्या काढून ठरविण्यात येईल.

(६) उप- नियम २, ३ मध्ये नमूद केलेले आरक्षण हे अशी निवडणूक घेण्यात येण्यापूर्वी, तीन महिने अगोदर ठरविण्यात येईल.

**१६. निवडून आलेल्या पथ विक्रेत्यांच्या प्रतिनिधींचा पदावधी.—**(१) निवडून आलेल्या प्रत्येक पथ विक्रेत्यांच्या प्रतिनिधींचा पदावधी हा, पाच वर्षे इतका असेल.

(२) कोणतीही नोंदणी केलेली पथ विक्रेत्यांची संघटना, कमाल चार जागांवर निवडणूक लढविण्यास हक्कदार असेल.

**१७. निवडणूक लढविण्यासाठीची पात्रता.—**अशी निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या व्यक्तीकडे, पुढील पात्रता असेल.—(१) तिने वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेली आहेत ;

(२) तिने अशा महानगरपालिकेच्या किंवा यथास्थिती नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये पथ विक्रेता म्हणून नाव नोंदणी केलेली आहे ;

(३) तिची संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे कोणतीही थकबाकी प्रलंबित नाही ;

(४) ती अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील, कोणत्याही फौजदारी अपराधासाठी सिद्धापराधी ठरलेली नाही;

**१८. निवडून आलेल्या पथ विक्रेता प्रतिनिधींची अपात्रता.—**(१) पथ विक्रेता म्हणून असलेली त्याची नोंदणी रद्द झाल्यास आणि अपील प्राधिकाऱ्याने त्यास पुष्टी दिल्यास, निवडून आलेला सदस्य अपात्र ठरेल.

(२) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये जेव्हा जेव्हा निवडून आलेला सदस्य कोणत्याही अपराधासाठी सिद्धापराधी असेल तर तो अपात्र ठरेल.

**१९. नगर पथ विक्रेता समितीची बैठक.—**(१) नगर पथ विक्रेता समितीची तीन महिन्यात एकदा बैठक होईल, तथापि, अध्यक्षास, स्वाधिकारे, किंवा स्थानिक प्राधिकरणांच्या अधिकारितेमधील किमान दहा सदस्यांनी विनंती केल्यावरून, विशेष बैठक, बोलावता येईल.

(२) बैठकीसाठीची विषयसूची नगर पथ विक्रेता समितीचे अध्यक्ष ठरवतील.

(३) बैठकीपूर्वी, किमान तीन दिवस अगोदर, नोटीस व विषयसूची देण्यात येईल.

**२०. बैठकीचे नियम.—**(१)नगर पथ विक्रेता समितीचे सदस्य संपूर्ण बैठकीत अनुशासन व सभ्याचाराचे पालन करतील.

(२) सदस्य, अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने एखादा प्रश्न उपस्थित करू शकतील.

(३) सदस्य, महानगरपालिकेच्या किंवा, यथास्थिति, नगरपरिषदेच्या एखाद्या कर्मचाऱ्यावर अनियमिततेसाठी एखादा ठपका ठेवण्यात किंवा दोषारोप करण्यात येत असल्यास, आवश्यक ती सर्व कागदपत्रे सादर करील.

(४) सदस्य, अशा बैठकीच्या दिनांकापासून पंधरा दिवस अगोदर, अध्यक्षाकडे प्रस्ताव, सूचना सादर करील.

(५) अध्यक्ष, ज्या सदस्यास चर्चेसाठी असलेल्या बोलायची सद्य विषयावर इच्छा असेल तर, अशा सदस्यास विशिष्ट वेळ नेमून देईल ;

परंतु, सदस्यास अगोदर चर्चेसाठी घेण्यात आलेल्या प्रश्नावर बोलण्याचा हक्क असणार नाही. अध्यक्षाचा निर्णय अंतिम असेल आणि यासंदर्भात सर्व सदस्यांवर तो बंधनकारक असेल.

(६) कोणत्याही विषयावरचा, प्रश्नावरचा निर्णय व मतांच्या विभाजनाने किंवा आवाजी मतदानाद्वारे साध्या बहुमताने घेण्यात येईल. मतदानाद्वारे निर्णय घ्यावयाच्या प्रकरणात, समसमान मते पडण्याच्या प्रकरणी, अध्यक्षास मत देता येईल.

(७) (एक) नगर पथविक्रेता समितीच्या बैठकीत बहुमताने किंवा आवाजी मतदानाने घेण्यात आलेला निर्णय हा मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीशी अथवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमातील/उप विधीतील अथवा त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसेल तर महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिती मुख्याधिकारी यांना नाकारता येईल.

(दोन) नगर पथ विक्रेता समितीच्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय हा मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८; महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीशी अथवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमातील/उप विधीतील अथवा त्यावेळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही असे निदर्शनास आणल्यास किंवा स्वतःहून महाराष्ट्र शासनास अशा बैठकीचे इतिवृत्त मागवता येईल व असा निर्णय रद्दबातल करता येईल.

(८) नगर पथविक्रेता समितीच्या सदस्यास, जर अशा सदस्याने अशा बैठकीकरिता केलेल्या नियमांचे उल्लंघन केले असेल तर बैठकीच्या उर्वरित कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात निलंबित करता येईल.

(९) अध्यक्षास, सुरक्षा कर्मचाऱ्यांना,अशा निलंबित सदस्यास किंवा सदस्यांस, बाहेर काढण्यासाठी आदेश देता येईल.

(१०) अशा बैठकीचे कार्यवृत्त तयार करण्यात येईल व प्रत्येक सदस्यास देण्यात येईल.

(११) सदस्यास बैठकीच्या सभागृहात बैठकीच्या कामकाजाशी संबंधीत नसतील अशी पत्रके, निशाण्या यांसारखे कोणतेही लेखी साहित्य किंवा अशा इतर गोष्टी आणण्यासाठी परवानगी असणार नाही.

(१२) सदस्य, बैठकीच्या सभागृहात, कोणतेही शस्त्रे, दारूगोळा किंवा इतर कोणतेही उपकरणे किंवा साधनेही आणणार नाही.

**२१. नगर पथविक्रेता समितीची कार्ये.—**नगर पथविक्रेता समिती पुढील कार्ये पार पाडील -(१) पथ विक्रेत्यांसाठीची शहराच्या हद्दीमधील विक्री करण्याची जागा ठरविणे प्रभाग समितीच्या शिफारशीनुसार त्या जागेचे मूल्यमापन आणि नियोजन करणे आणि विक्रीकरिता नेमून द्यावयाचे क्षेत्र किंवा जागा निर्बंधमुक्त पथ विक्री झोन (प्रक्षेत्र), निर्बंधीत पथ विक्री झोन (प्रक्षेत्र) आणि पथ विक्री मुक्त झोन (प्रक्षेत्र) राखून ठेवणे. सणांनिमीत्ताचे बाजार, रात्र बाजार, आठवडी बाजार व तात्पुरते बाजार (आंबा, संत्रे, इत्यादी सारख्या फळांकरीता) यासांठी जागा नेमून देणे;

(२) कायम विक्रेत्यांसाठी साधनांचे प्रकार (उदा. गाळा/टपरी/खोका) आणि फिरत्या विक्रेत्यांकरिता हलविता येण्याजोगे साधन प्रकार ठरविणे;

(३) प्रत्येक पथविक्री झोनची (प्रक्षेत्राची) धारण क्षमता निर्धारित व निश्चित करणे आणि त्या मर्यादेपर्यंतच कायम विक्रेत्यांची व फिरत्या पथ विक्रेत्यांची नाव नोंदणी करणे ;

(४) कायम व फिरते पथविक्रेते आणि इतर प्रवर्गातील विक्रेते यांना विक्रीसाठी अनुज्ञेय असणाऱ्या उत्पादनाचे प्रकार ठरविणे ;

(५) फिरत्या पथविक्रेत्यांकरिता गाड्यांचे प्रकार व आकार ठरविणे ;

(६) पथविक्री झोन (प्रक्षेत्र) मधील पथविक्रेत्यांसाठी नागरी सोयी-सुविधा पुरविणे ;

(७) पथ विक्रेत्यांच्या कल्याणासाठी सामाजिक-आर्थिक योजना सुकर करणे ;

(८) पथ विक्री आणि कसूरदारांविरूद्ध सुधारात्मक कारवाई याकरिता अटी व शर्ती ठरविणे ;

(९) पथविक्रेत्यांचे विनियमन करण्यासंबंधात इतर सर्व प्रश्न सोडविणे ;

(१०) स्थानिक प्राधिकरणास वार्षिक अहवाल सादर करणे ;

(११) पथविक्रीकरिता क्षमता उभारणी आणि अशा इतर सुधारणांचे प्रचालन करणे ;

(१२) पथविक्रेत्यांना वित्तीय सहाय्य पुरविण्यासाठी मदत करणे ;

(१३) अधिनियम कलम २४ (१) नुसार नगर पथ विक्री समितीच्या संबंधात त्यांना मदत करण्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी कोणत्याही व्यक्तींची नियुक्ती करणे.

**२२. नगर पथविक्रेता समितीस कोणत्याही व्यक्तीचा, संघटनेचा, संघाचा, कंपनीचा.—**मग ती कोणत्याही नावाने ओळखली जाणारी असो - सल्ला किंवा सहाय्य घेता येईल.

नगरपथ विक्रेता समिती, यासंबंधात ठरवून देईल त्या प्रमाणे उप-नियम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अशा सहाय्यासाठी किंवा सल्ल्यासाठी पारिश्रमिक देण्यात येईल. असे सहाय्य किंवा सल्ला हा नगर पथ विक्रेता समितीच्या बैठकीत तिच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.

**२३. नगर पथविक्रेता समितीच्या कार्यालयाची जागा आणि कर्मचारीवर्ग.—**स्थानिक प्राधिकरण, नगर पथविक्रेता समितीला अशा महानगरपालिकेच्या किंवा, यथास्थिति, नगरपरिषदेच्या विशेषसमितीला लागू असल्याप्रमाणे यथोचित कार्यालयीन जागा व कर्मचारी वर्ग पुरवील.

**२४. नगर पथविक्रेतासमिती पुढील अभिलेख ठेवील.—**(१) नोंदणी केलेल्या पथविक्रेत्यांचा प्रभागनिहाय अभिलेख ;

(२) ज्यांना पथविक्रीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे अशा पथ विक्रेत्यांचा, त्यास नेमून दिलेली जागा किंवा विक्रीकेंद्र, विक्रीसाठी अनुज्ञेय केलेला माल, पथविक्रीचा प्रवर्ग यासारखा तपशील ;

(३) नगर पथविक्रेता समिती, तिच्या बैठकी आणि त्यात घेतलेले निर्णय यांच्याबाबत सर्व अभिलेखही ठेवील ;

(४) नगर पथविक्री समितीने, अशा पथविक्रेत्यांसाठी कौशल्य आणि वित्तीय सहाय्य देण्यासंबंधात कोणतेही उपक्रम हाती घेतले असल्यास असे उपक्रम ;

(५) अधिनियमाच्या कलम २८(१) खाली सादर केलेले अहवाल किंवा इतर कोणतीही माहिती ;

(६) कामगार आयुक्ताने सादर केलेला निवडणूक अहवाल किंवा अभिलेख ;

(७) अधिनियमाच्या कलम २६ (३) अन्वये आवश्यक केलेले सामाजिक लेखापरीक्षणाचे अहवाल ;

(८) नगर पथविक्रेता समिती, वेळोवेळी ठरवील असे इतर कोणतेही अहवाल, दस्तऐवज.

**२५.** (१) नगर पथ विक्रेता समिती, वर्षातून एकदा, पथविक्रेत्यांसाठी हाती घेतलेल्या विविध समाज कल्याण योजना, देण्यात आलेले कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आणि पुरविलेले वित्तीय सहाय्य, कोणतेही असल्यास, त्यांच्या संबंधातील एक अहवाल, स्थानिक प्राधिकरणाला सादर करील.

(२) नगर पथ विक्रेता समिती, वर्षातून एकदा, घेतलेले निर्णय आणि पथविक्रेत्यांसाठी हाती घेतलेल्या विविध समाज कल्याण योजना, देण्यात आलेले कौशल्य विकासाचे प्रशिक्षण आणि पुरविलेले वित्तीय सहाय्य, कोणतेही असल्यास, त्यांच्या संबंधातील एक अहवाल, राज्य शासनास सादर करील.

**२६.** (१) स्थानिक प्राधिकरण राज्य शासनाकडून मान्यता मिळाल्याप्रमाणे अशी मान्यता मिळण्याच्या दिनांकापासून, एक महिन्याच्या कालावधीत योजनांचा सारांश प्रसिद्ध करील.

(२) असा सारांश किमान दोन स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल. असा सारांश स्थानिक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर त्याचप्रमाणे संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या सूचना फलकावरही प्रदर्शित करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**सं. श. गोखले,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th October 2015

*NOTIFICATION*

THE STREET VENDORS (PROTECTION OF LIVELIHOOD AND REGULATION OF STREET VENDING) ACT, 2014.

No. (NHP. 2014/C.R. 403/UD-34).—The following Draft Rules, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 36 of the Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, 2014 (7 of 2014), and of all other powers enabling it in that behalf, with a view to regulating and control the Hawkers in the areas of Municipal Corporations and Municipal Councils, is hereby published for the information of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said Draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on and after the expiry of a period of thirty days from the date of publication of this notification in the *Maharashtra Government Gazette.*

2. Any objection or suggestion, which may be received by the Secretary (UD-2), Urban Development Department, 4th Floor, Mantralaya, Mumbai 400 032, by post or by E-mail (uddus34@gmail.com) from any person with respect to the said draft, within the aforesaid period, will be considered by the Government.

## Draft Rules

No. (NHP.2014/C.R.403/UD-34).—Urban Development Department, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai -400 032. Whereas, the Government of Maharashtra, Urban Development Department, by Notification No. (NHP. 2014/C.R. 403/UD-34,) dated — /— /—— published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary Part-I-A announced its intension to make Rules, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 36 of the Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, 2014 (7 of 2014) with a view to regulating and control the Hawkers in the area of the Municipal Corporations and Municipal Councils ;

And whereas, the objections and suggestions received pursuant to the said notification within the period mentioned therein have been considered by the Government.

Now, therefore, in exercise of the powers conferred by the Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, 2014 (7 of 2014), the Government of Maharashtra after previous publication, make the following Scheme regulating control of the Hawkers in the area of the Municipal Corporations and Municipal Councils, as follows, namely :—

### CHAPTER I

PRELIMINARY

1. *Short title, extent, Commencement and provisions.*— (*i*) These rules may be called the Maharashtra Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Rules, 2015.

(*ii*) They shall extend to all the urban areas of the State of Maharashtra.

(*iii*) They shall come into force on such date as the Government of Maharashtra may, by notification in the *Official Gazette*, appoint.

(*iv*) The provision of these rules shall not apply to any land, premises and trains owned and controlled by the Indian Railways under the Railway Act, 1989 (24 of 1989).

2. *Definitions*.- In these rules, unless the context required otherwise,—

(*a*) "Act" means the Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, 2014.

(*b*) "Caste Certificate" means a certificate issued by competent authority under the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (Vimukta Jatis), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of Caste Certificate) Rules, 2012 or any other relevant Act or rule made by Government of Maharashtra time to time in this regard.

(*c*) "The Chief Officer" means Chief Officer of the Municipal Council constituted under the provisions of the and the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) and shall include Additional Chief Officer and Assistant Chief Officer.

(*d*) "Existing Street Vendor" means a registered street vendor who is engaged in street vending prior to the second survey of street vendors.

(*e*) "Family" includes a person, his or her spouse, minor children, minor brothers and minor sisters dependent on him :

Provided that widows, divorcees and women deserted by families shall be considered separate families ;

*Explanation.*— An adult of any gender with or without spouse or children or dependents shall be considered as a separate family for the purposes of this rule.

(*f*) "Grievances Redressal Committee" means the Committee constituted by sub section (*1*) of Section 20 of the said Act.

(*g*) "Income Certificate" means a certificate showing annual gross income issued by competent authority under relevant Act within the jurisdiction of local authority.

(*h*) "Licensing Authority", the officer designated by the Municipal Commissioner or Chief Officer as the case may be, to issue the certificate of vending and the identity cards to the street vendors as per the terms and conditions mentioned in the scheme.

(*i*) "Municipal Commissioner" means an officer appointed by Government of Maharashtra under the provisions of the Mumbai Municipal Corporation Act, 1888, the Maharashtra Municipal Corporations Act, 1949 and shall include Additional Municipal Commissioner, Deputy Municipal Commissioner and Assistant Municipal Commissioner.

(j) "Source of Livelihood" means occupation, business or any other act, by whatsoever name may be called, which provides monetary gain to one or more individuals in a family, sufficient enough to meet day to day expenses of the family.

(*k*) "Ward Committee" means the Committee appointed by the Municipal Commissioner or Chief Officer as the case may be, to perform one or more function as prescribed in the Act.

(*l*) The word or expressions in these rules, unless expressed specifically, shall have the same meaning as in the Street Vendors (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, 2014.

3. *Minimum age for street vending.*—Every street vendor who has completed fourteen years of age may be given certificate of street vending, subject to the provisions of the Child Labour (Prohibition and Regulation) Act, 1986 and the rules framed thereunder.

4. (*i*) The street vendor, aggrieved by order made by the Municipal Commissioner or Chief Officer as the case may be, may file an application before Grievances Redressal Committee within a period of fifteen days from the receipt of such order.

(*ii*) The Grievances Redressal Committee may condone delay in filing an application as provided in sub-rule (i), if it is satisfied that, the applicant could not file the appeal during the said period for circumstances beyond him control and shall record the reasons for such condonation.

(*iii*) The application may be made on plain paper mentioning the reason of grievances.

5. *Time to decide the appeal.—(1)* The Grievances Redressal Committee shall after giving due opportunity to the applicant and ascertaining the facts from the Licensing Authority, may decide the application within forty-five days of the receipt of such application.

*(2)* The Grievances Redressal Committee shall communicate the reasoned order to the applicant.

6. *Appeal to local authority.—(1)* Any person who is aggrieved by the decisions of Grievances Redressal Committee, or the Town Vending Committee as the case may be may prefer an appeal to the local authority within the period of thirty days, from the receipt of such order.

*(2)* The appeal may be made on plain paper mentioning the reasons for such appeal along with the order of Grievances Redressal Committee or the Town Vending Committee as the case may be.

*(3)* The local authority may condone the delay, upon satisfying itself and by recording such reasons thereof. If it is satisfied that the appellant could not file the appeal for circumstances beyond his control.

*(4)* The local authority may decide such appeal within period of forty-five days from receipt of such appeal. The decision taken shall be duly communicated to the applicant.

7. *Constitution of Town Vending Committee.—(1)* The Government of Maharashtra may constitute Town Vending Committee under the chairmanship of the Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, for each local authority.

*(2)* The Constitution of Town Vending Committee may be as under :—

*(a)* The Constitution of Town Vending Committee in Municipal Corporation area.—

| | | |
|---|---|---|
| *(i)* | The Municipal Commissioner | .. Chairperson ; |
| *(ii)* | The Executive head or representative of Special Planning Authority. | .. Member ; |
| *(iii)* | The Police Commissioner or Superintendent of Police | .. Member; |
| *(iv)* | The Additional Municipal Commissioner | .. Member ; |
| *(v)* | The Joint Commissioner of Police or Deputy Superintendent of Police / Assistant Superintendent of Police (officer in-charge of traffic) | .. Member ; |
| *(vi)* | The Executive Health Officer or Chief Medical Officer | .. Member ; |
| *(vii)* | Representative of Lead Bank | .. Member ; |
| *(viii)* | Deputy Municipal Commissioner nominated by the Municipal Commissioner or Assistant Director, Town Planning | .. Member ; |
| *(ix)* | Leader of the House | .. Member ; |
| *(x)* | Leader of Opposition | .. Member ; |
| *(xi)* | Representatives of Street Vendors Association, shall not be less than forty per cent of the total Town Vending Committee Members | .. Member : |

Provided that one-third of members representing the street vendors shall be amongst women vendors and due representation shall be given to the Scheduled Caste, the Scheduled Tribes, Other Backward Classes, minorities and persons with disabilities as prescribed by Government of Maharashtra from time to time;

| | | |
|---|---|---|
| *(xii)* | Representative of Market Association | .. Member ; |
| *(xiii)* | Representative of Traders Association | .. Member ; |

| | | |
|---|---|---|
| *(xiv)* Two Representatives of Non-Government Organisation | . | Member ; |
| *(xv)* Two Representatives of Community Based Organisation | .. | Member ; |
| *(xvi)* One representative of Resident Welfare Association | .. | Member ; |
| *(xvii)* Deputy Municipal Commissioner (in-change of street vending) | .. | Member-Secretary. |

(*b*) Constitution of Town Vending Committee for Municipal Council areas.—

| | | |
|---|---|---|
| *(i)* The Chief Officer of Municipal Council | .. | Chairperson ; |
| *(ii)* Member nominated by the President of the Municipal Council or Leader of the House. | .. | Member ; |
| *(iii)* Leader of the Opposition | .. | Member ; |
| *(iv)* The in-charge of Police Station | .. | Member ; |
| *(v)* The in-charge of local Traffic Police | .. | Member ; |
| *(vi)* The Medical Health Officer | .. | Member ; |
| *(vii)* The in-charge of Town Planning | .. | Member ; |
| *(viii)* Representative of Special Planning Authority (as the case may be) | .. | Member ; |
| *(ix)* Representative of Lead Bank | .. | Member ; |
| *(x)* Representatives of Street Vendors Association, shall not be less than forty per cent of the total Town Vending Committee members | .. | Member : |

Provided that one-third of members representing the street vendors shall be amongst women vendors and due representation shall be given to the Scheduled Caste, the Scheduled Tribes, Other Backward Classes, minorities and persons with disabilities as precribed for time to time by Government of Maharashtra.

| | | |
|---|---|---|
| *(xi)* Representative of Market Association | .. | Member ; |
| *(xii)* Representative of Trader Association | .. | Member ; |
| *(xiii)* Two Representatives of Non-Governmental Organisation | .. | Member ; |
| *(xiv)* Representative of Community Based Organisation | .. | Member ; |
| *(xv)* Representative of Resident Welfare Association | .. | Member ; |
| *(xvi)* The in-charge of street vending department of the Municipal Council. | .. | Member-Secretary. |

8. *Nomination for Town Vending Committee.—(1)* The Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, shall invite application from the interested persons to be nominated on the Town Vending Committee from the category of,—

*(a)* Market Associations ;

*(b)* Traders Associations ;

*(c)* Non-Governmental Organiations ;

*(d)* Community Based Organisations ;

*(e)* Resident Welfare Associations :

Provided that a wide publicity, through at least two local newspapers, notice boards of headquarters and all ward offices shall also be displayed. It shall also be displayed on the website of Municipal Corporation or Municipal Council, as the case may be.

(2) The application may be received within fifteen days from date of last publication of such notice.

9. *Minimum qualification.*—The minimum essential qualification for such nomination shall be as below:—

*(a)* The Organisation or Association shall be registered with Competent Authority in the field as specified in sub-rule 1 of rule 8.

*(b)* The Organisation or Association shall produce minimum last three years audit reports from competent agency.

*(c)* The Organisation or Association should not be blacklisted from the Corporation/ Municipal Council, as the case may be.

*(d)* The Organisation or Association shall not be convicted under any Law in force.

*(e)* The Organisation or Association should have minimum five years experience in working, in the category of its registration with Competent Authority.

10. (*1*) Whenever more application are received, the Town Vending Committee consisting of *ex-officio* members may select the representatives to be nominated for the category specified, in rule 7(*2*)(*a*)(*xii*) to 7(*2*)(*a*)(*xvi*) and 7(*2*)(*b*)(*xi*) to 7(*2*)(*b*)(*xv*).

(2) The Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, shall appoint such members from representatives of the organization or association, as the members of Town Vending Committee.

11. *Street vendor's representative by election.*—The Labour Commissioner or his subordinate officer not below the rank of Labour Officer shall conduct election for appointment of the representatives of street vendors in Municipal Corporation or Municipal Council, as the case may be.

12. *Voters list.*—The Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, shall provide the list of registered street vendors to Labour Commissioner, for the purpose of electing representatives among the registered street vendors. For purpose of such election, the list of registered street vendors shall be the voter list.

13. (*1*) The Labour Commissioner shall notify the election programme for filling such nominations, with time and place and also give wide publicity to the election programme in at least two local newspapers as well as on the official website of the concern Municipal Corporation or Municipal Council as the case may be.

(*2*) The election programme shall be as follows :—

*(a)* Seven days from the date of notification of election for filling of nomination papers, inclusive of first and last day of nominations ;

*(b)* Time & place of scrutiny of such received nominations, Provided that it shall not be later than two days from the last date of filling nomination papers. The Labour Commissioner shall also allot the symbols for such candidates on the same day ;

*(c)* last date of withdrawal of nomination paper,which shall not be later than two days from the date of scrutiny of nominations ;

*(d)* date of polling, which shall be not later than fifteen days from the date of withdrawal of candidature.

*(e)* the Labour Commissioner shall count the votes polled to each candidate and submit the list of validly elected members to the Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be.

14. *(1)* The Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, shall provide all the infrastructure, necessary for the conduct of such election.

*(2)*The Labour Commissioner shall appoint, the Presiding Officers for such election and shall submit the result to the Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be.

15. *(1)* The Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, from the Election ward equal to the number of street vendor representatives that are to be elected on Town Vending Committee ;

Provided that the Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, shall prepare road wise list of registered street vendors. As far as possible, these electoral wards may be prepared by taking into consideration, the existing Prabhag Samitis or the administrative zones or the wards. The Municipal Commissioner or the Chief Officer, as the case may be, may club entire or some part of zone or ward or Prabhag Samiti, as may be deemed fit, to form the electoral ward.

*(2)* There shall be Reservation for the street vendors from Schedule Castes, Schedule Tribes and Other Backward Classes, minorities and persons with disabilities as may be prescribed by Government of Maharashtra from time to time and shall not be less than one seat for each category.

*(3)* There shall be one third reservation for women.

*(4)* The reservation for women shall be decided by drawing of lots in the Town Vending Committee.

*(5)* The seats reserved in sub-rule (*2*) shall also be decided by drawing of the lots in the Town Vending Committee.

*(6)* The reservation as mentioned in sub-rule (*2*), (*3*) shall be decided before three months earlier, before such election is being held.

16. *Term of elected representatives of street vendors.—(1)* The term of each elected representative of street vendors may be for five years.

*(2)* Any registered street vendor's organisations shall be entitled to contest maximum of four seats.

17. *Qualifications for contesting the election.*—The person contesting such election shall posses the following qualifications:—

*(1)* shall have attained the age of 18 years ;

*(2)* shall be registered street vendor within the limits of such the Municipal Corporation or the Council, as the case may be ;

*(3)* shall not have any dues pending to the concern local authority ;

*(4)* shall not be convicted under any criminal offence, under any law in force :

18. *Disqualification of elected representative of street vendors.—(1)* The elected member shall be disqualified, whenever his registration of street vendor is cancelled and is confirmed by the appellate authority.

*(2)* Whenever the elected member is convicted for any criminal offence under any Law in force.

19. *Meeting of Town Vending Committee.—(1)* The Town Vending Committee may meet once in three months, however, chairperson may call special meeting, *suo moto* or on request from atleast ten members within the jurisdiction of local authority.

*(2)* The agenda for the meeting shall be decided by the Chairman of Town Vending Committee.

*(3)* Minimum three days prior notice & agenda may be given before the meeting.

20. *Rules for meetings.—(1)* The members of Town Vending Committee shall observe discipline and decorum during the entire meeting.

*(2)* The member may raise any issue with prior permission of Chairperson.

*(3)* The member shall submit all such necessary documents in case, any allegation or charges for irregularity is being made on any employee of the Municipal Corporation or the Municipal Council, as case may be.

*(4)* The member shall submit proposal, suggestions in writing to the chairperson atleast fifteen days prior to the date of such meeting.

*(5)* The chairperson may allot specific time slot to the member who wish to speak on current topic for discussion ;

Provided that a member shall not be entitled to speak on the earlier issue taken up for discussion. The decision of chairperson shall be final and binding upon all the members in this regard.

*(6)* The decision on any topic, issue, may be taken by division of vote or by simple majority by voice vote. In case the decision by vote, the chairperson may caste vote, in case of a tie.

*(7)* (*i*) Whenever the proposal is passed in Town Vending Committee on majority of votes or voice of vote as the case may be; and if, it is not in consonance with the Mumbai Municipal Corporation Act, Maharashtra Municipal Corporation Act 1949, MRTP, Maharashtra Municipals Councils, Nagar panchayat and Township Act 1965 or any other Law in force, the Act and the Rules & Schemes, Bylaws prepared under the Act; or any other law in forced; Municipal Commissioner / Chief Officer as the case may be, may reject such proposal.

(*ii*) The Government of Maharashtra, *suomoto* or whenever it is brought to the notice, may recall the proceedings of the Town Vending Committee and revoked the proposals passed which are not in consonance with the provisions of the Act; Mumbai Municipal Corporation Act, Maharashtra Municipal Corporation Act, 1949, MRTP, Maharashtra Municipals Councils Nagar panchayat and Township Act, 1965 or any other Law in force.

(*8*) The members of the Town Vending Committee may be temporarily suspended for the remaining period of the meeting, in case such member contravenes the rules made for conduct of such meeting.

(*9*) The Chairperson may order to security personnel to drive away such suspended member or members, as the case may be.

(*10*) The minutes of such meeting may be drawn up and circulated to each member.

(*11*) The member shall not be allowed to bring any written material such as pamphlets, banners or such things in meeting hall, which are not in accordance with the business of the meeting.

(*12*) The member shall also not bring any weapons, ammunitions or any such instruments or device in the meeting hall.

21. *Functions of Town Vending Committee.*—The Town Vending Committee shall perform the following functions.—

*(1)* to decide the place of vending in city limit for street vendors should assessed and planned, as per the recommendations of Ward Committee and the area or space to be alloted for vending, to earmark the 'restriction-free vending zones, restricted vending zones and no vending zones, To allocate space for Festival Bazaars, Night Bazaars, Weekly Bazaars and Temporary Bazaars (For fruits like Mango, Orange etc.)

*(2)* To decide the types of appliances for stationary vendors (e.g. stall, kiox, khoka) and moving appliances for mobile vendors.

*(3)* To decide the type of commodity permitted for sale to the stationary and mobile street vendors and other category of vendors.

*(4)* To decide the types and sizes of carts for mobile street vendors.

*(5)* To provide the civic facilities to the street vendors in vending zones.

*(6)* To facilitate the socio-economic schemes for the welfare to the street vendors.

*(7)* To set the terms and conditions for street vending and corrective action against defaulters.

*(8)* To facilitate all other issues related to regulation of street vendors.

*(9)* To submit annual report to local authority.

*(10)* To promote capacity building and other such improvement for street vending.

*(11)* To help in providing financial assistance to street vendors.

*(12)* To appoint any person to assist itself or advise the related to Town Vending Committee as per Sec. 24(*1*) of the Act.

22. The Town Vending Committee may seek advice or assistance of any person, organisation, association, company, by whatsoever name, it maybe called. The remuneration to such assistance or advice, as mentioned in sub rule (1) may be given as may be decided by the Town Vending Committee in this regard.

Such assistance or advice shall be tabled before the Town Vending Committee meeting for the consideration of its recommendation.

23. *Office space and employees of Town Vending Commiittee.*—The local authority shall provide the Town Vending Committee appropriate office space and staff, as is applicable to Special Committees of such Municipal Corporation or the Municipal Council, as the case may be.

24. The Town Vending Committee shall maintain the following record.—

*(1)* wardwise record of registered street vendors ;

*(2)* the street vendors who have been issued certificate of vending, alongwith details such as the allotted, pitch or stall, goods permitted to sale, the category of street vending ;

*(3)* the Town Vending Committee shall also maintain all the record with regards to its meetings and decisions taken ;

*(4)* initiatives taken by the Town Vending Committee with regards to imparting skills and financial assistance, provided if any, to such street vendors ;

*(5)* the reports or any other information submitted under Sec. 24(*1*) of the Act ;

*(6)* the Election report or record submitted by the Labour Commissioner ;

*(7)* the report of social audit as required under Sec. 26 (*3*) of the Act ;

*(8)* any other record, documents which the Town Vending Committee may decide from time to time.

25. *(1)* The Town Vending Committee shall submit a report to the Local authority once in a year, with regards to various social welfare schemes undertaken,skill improvement training given and financial assistance provided, if any to the street vendor.

*(2)* The Town Vending Committee shall submit a report once in a year to the State Government, with regards to the decisions taken and various welfare schemes undertaken, skill improvement training given and financial assistance provided to the street vendors.

26. *(1)* The Local authority shall publish the summary of the scheme, as approved by the State Government within a period of one month, from date of receipt of such approval.

*(2)* Such summary shall be published in minimum two local news paper such summary shall also be displayed on website of the local authority as well as the notice board of local authority concerned.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. GOKHALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.